-: प्रेसनोट दिनांक- १८/०६/२०२२ :-

**अमित भागवत पांडे, पोलीस उप निरीक्षक नेम. चंदगड पोलीस ठाणे, रा. आर जे पाटील यांचे घरी भाडयाने मजरे,कार्वे ,ता.चंदगड,जिल्हा कोल्हापुर,मुळ रा.मुपो खोतवाडी,ता.हातकणंगले जिल्हा कोल्हापुर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारलेबाबत.........**

---

यातील तक्रारदार व त्यांचे चुलत भाऊ यांचेत शेतजमिनीचे वादातुन दि.०१.०६.२०२२ रोजी भांडण झाले होते. त्या अनुषघाने तक्रारदार व त्यांचे वडील यांचे विरूध्द दि.०२.०६.२०२२ रोजी चंदगड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं १५५/२०२२ भा द वि कलम ३२६ वगैरे प्रमाणे गुन्हा दाखल केला होता.त्यामध्ये तक्रारदार यांना अटक करणेत आली होती त्यानंतर तक्रारदार यांना जामीन मिळालेनंतर तक्रारदार यांचेवर दखल असलेल्या गुन्हयाचे तपास करणारे पोलीस उप निरीक्षक पांडे यांनी तक्रारदार यांना पोलीस ठाणेत बोलावुन त्यांना गुन्हयाचे कामी मदत करतो असे सांगुन ५०,०००/-रूपयाची लाचेची मागणी केलेने तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर विभागाकडे तक्रार केली होती.

तकारीप्रमाणे आज दि. १८.०६.२०२२ रोजी पडताळणी केली असता, चंदगड पोलीस ठाणे येथे, पोलीस उप निरीक्षक अमित भागवत पांडे यांनी तक्रारदार यांचेकडे त्याचे व त्याचे वडील यांचे विरूध्द दाखल गुन्हयामध्ये त्यांना मदत करणेसाठी ५०,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडील अंती ४०,०००/-रू लाचेची मागणी केली व त्याचा पहीला हप्ता २०,०००/- रू घेवुन येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले त्यानंतर वेगुर्ला ते बेळगांव जाणारे रोडवर मजरे कार्वे गावामध्ये सापळा कारवाई आयोजित केली असता, आरोपी लोकसेवक अमित भागवत पांडे पोलीस उप निरीक्षक यांनी मागणी केलेली ४०,०००/-रू लाच रक्कमेपैकी प्रथम २०,०००/- लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक अमित भागवत पांडे, पोलीस उप निरीक्षक नेम. चंदगड पोलीस ठाणे, रा. आर जे पाटील यांचे घरी भाडयाने मजरे,कार्वे ,ता. चंदगड,जिल्हा कोल्हापुर,मुळ रा.मुपो खोतवाडी,ता.हातकणंगले जिल्हा कोल्हापुर यांचेवर चंदगड पोलीस ठाणे जिल्हा कोल्हापुर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, व मा. श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार श्री. नितीन कुंभार पोलीस निरीक्षक, पो.ना/ सुनिल घोसाळकर, पोना/नवनाथ कदम व पोकॉ/मयुर देसाई, पोकॉ/संदिप पडवळ ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.**

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३,

४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

५)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner